# <u>नियमित दिवाणी दावा क्र.१६८/२०१४ मधील निशाणी १८ वरील आदेश</u>

१. परत बोलीचे खरेदीपत्रावरुन प्रतिवादीकडुन उलट खरेदीपत्र करुन मिळणेबाबत वादीने सदरचा दावा केला आहे. त्यामध्ये दावा दुरुस्तीकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, दाव्यामध्ये दावा मिळकतीचे मुळ हक्कदार म्हणजेच वादी यांचे पूर्वहक्कदार निवृत्ती यांचे वारसांना या दाव्याचे कामी सामिल करणे आवश्यक आहे. वादी यांचे पूर्वहक्कदार निवृत्ती यांना विवाहीत मुली हया वारस असून त्यांना दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी नं. ३ व ४ म्हणून मयत निवृत्ती यांच्या विवाहीत मुली म्हणजे उषा आनंदराव देसाई व नंदा काशिनाथ मोहिते यांना दाव्यामध्ये सामिल करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे. त्याचप्रमाणे दावा कलम २ नंतर विवाहीत मुली यांना वादीसह मयत निवृत्ती यांचा वारसा आहे अशा प्रकारचा मजकूर दाव्यामध्ये समाविष्ट करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे देवून दावा दुरुस्तीस विरोध दर्शविला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा दाखल करताना सर्व वारसांना जाणीवपूर्वक सामिल केले नव्हते. प्रतिवादीने कैफीयत दुरुस्त केलेनंतर वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही याची जाणीव झालेवर वादीने सदरची दुरुस्ती मागितली आहे. वादीचा हेतू हा शुध्दपणाचा नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करण्याची प्रतिवादीने

विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

५. परत बोलीचे खरेदीपत्रावरुन प्रतिवादीकडुन उलट खरेदीपत्र करुन मिळणेबाबत वादींनी सदरचा दावा केला आहे. दाव्यातील कथनाप्रमाणे वाद मिळकत ही मयत निवृत्ती यांची वडीलार्जित वारस मालकीहक्काची आहे. वाद मिळकत ही मयत निवृत्ती यांनी प्रतिवादी यांना परत बोलीचे कराराने खरेदी दिलेली आहे. सदर वाद मिळकत उलट खरेदी देण्याचा लेखी करार मयत निवृत्ती व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेला होता व आहे. वादींच्या कथनावरुन असे दिसून येते की, दावा मिळकतीमध्ये वादींना मयत निवृत्ती यांचेकडुन मालकी प्राप्त झाली आहे. दावा मिळकतीमध्ये वारस म्हणून त्यांचे मुलींनाही हक्क व अधिकार आहे. सबब या दाव्यामध्ये परिणामकारक न्यायनिर्णय देण्याकरीता मयत निवृत्ती यांचे सर्व वारसांची उपस्थिती आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे दाव्यामध्ये आवश्यक अशा पक्षकारास दाव्याच्या कोणत्याही सामिल करता येते.

६. त्याचप्रमाणे वादी यांनी दावा कलम २ नंतर दुरुस्तीद्वारे सामिल करुन मागितलेली प्रस्तावित वारसांबद्द्लची कथने ही मुळ दाव्यास अनुसरुन अशी आहेत. ती मुळ दाव्याच्या कथनाच्या विरोधात नाहीत. सदरचा दावा हा अद्याप सुरुवातीच्या टप्प्यावर आहे. याकामी अद्याप वादमुद्द्े देखील निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे वादींनी मागितलेली दुरुस्ती ही मंजूर करणेस पात्र आहे. सबब मी खालील आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशणी १८ मंजूर करण्यात आला.

२. अर्ज निशाणी १८ मधील मागणीप्रमाणे दावा दुरुस्ती करणेस वादीस परवानगी देणेत येत आहे.

३. वादीने आजपासून सात दिवसांचे आत दावा दुरुस्त करुन त्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी तसे न केलेस निशाणी १८ वरील दावा दुरुस्तीचा आदेश आपोआप रद्द् समजण्यात येईल.

४. वादीने सदर आदेशाची नोंद घ्यावी.

कराड. ( ए.जे. पाटील )
दिनांक :— ३०/११/२०१६. ८वे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
कराड.